## दिन विशेष...

१४९३ : दर्यावर्दी कोलंबसाने उलपर्यटनास सुरुवात केली.
१८८१ : केसरी वृत्तपत्राची सुरुवात.
१९२४ : प्रख्यात मराठी साहित्यिक विद्याधर गोखले यांचा जन्म.
१९६४ : भारतातील पहिले डिझेल इंजिन वाराणसी येथे तयार झाले.

# शौर्य मराठी
महाराष्ट्राचे निडर दैनिक
RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ८५,७६२.०१ +५७३.४१(०.६७%)
डॉलर ₹ ९०.०१

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३० | १६ |
| दिल्ली | १७ | ०९ |
| मुंबई | ३३ | २० |
| नागपूर | २८ | १५ |
| पुणे | २९ | १३ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | रविवार, दि. ४ जानेवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ५६ किंमत : ५ रु. | पाने ४


### सुविचार
स्वतःवर विश्वास ठेवा, तुमच्या यशाचं उंबरठं जवळ आहे.

सुर्योदय - सुर्यास्त
स.-७:०६ संध्या-६:००

### सोने – चांदी
सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,३८,५९०/- २,४१,०००/-

### केळी भाव
नवती : ७५१ ते ७७०
पिल बाग : २५१ ते २७०
कांदे बाग : ----

# अमेरिकेचा वेनेझुएलावर भीषण हल्ला

## राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो अन् पत्नीला अमेरिकेकडून अटक



वृत्तसंस्था । काराकास

**जागतिक राजकारणाला हादरावणारी एक मोठी बातमी समोर आली आहे. अमेरिकेने वेनेझुएलावर मोठी लष्करी कारवाई केली असून, वेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो आणि त्यांच्या पत्नी सिलिया फ्लोरेस यांना अमेरिकन सुरक्षा दलांनी ताब्यात घेतले आहे. खुद्द अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या कारवाईची पुष्टी केली असून, मादुरो यांना अटक करून देशाबाहेर नेण्यात आल्याचा दावा केला आहे.**

शनिवारी पहाटे (स्थानिक वेळेनुसार रात्री २ च्या सुमारास) वेनेझुएलाची राजधानी काराकास भीषण स्फोटांनी हादरली. प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, किमान सात मोठे धमाके ऐकू आले आणि आकाशात अत्यंत कमी उंचीवरून जाणारी लढाऊ विमाने दिसली. या हल्ल्यांनंतर काराकासमध्ये दहशतीचे वातावरण पसरले असून नागरिक घाबरून घराबाहेर पडले आहेत. राष्ट्राध्यक्ष मादुरो यांनी तातडीने देशात आणीबाणी घोषित केली होती, मात्र त्यानंतर काही वेळातच त्यांना ताब्यात घेण्यात आले.

दुसरीकडे, व्हेनेझुएला सरकारने अमेरिकेचे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. अमेरिकेला अमली पदार्थांशी काहीही देणेघेणे नसून, त्यांना केवळ व्हेनेझुएलाच्या अफाट तेल संपत्तीवर आणि नैसर्गिक वायूवर कब्जा करायचा आहे, असा प्रतिआरोप काराकासकडून करण्यात आला आहे. आंतरराष्ट्रीय कायदेतज्ज्ञांनीही अमेरिकेच्या या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

कोणत्याही ठोस पुराव्याशिवाय दुसऱ्या सार्वभौम देशाच्या राष्ट्राध्यक्षांना अटक करणे आणि त्यांच्या नौकेवर हल्ले करणे हे आंतरराष्ट्रीय नियमांचे उल्लंघन असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. या लष्करी कारवाईमुळे आता दक्षिण अमेरिकेसह संपूर्ण जगात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, जागतिक तेल बाजारावरही याचे गंभीर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### ➢ अमली पदार्थांच्या तस्करीचा गंभीर आरोप
**या लष्करी कारवाईचे समर्थन करताना अमेरिकन प्रशासनाने व्हेनेझुएलावर अमली पदार्थांच्या तस्करीचा गंभीर आरोप केला आहे. मादुरो सरकार अमेरिकेत कोकेन आणि फेंटेनाइलची तस्करी करत असून, यामुळे अमेरिकेच्या राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण झाल्याचा दावा ट्रम्प यांनी केला आहे. याशिवाय, मादुरो यांच्या दमनकारी धोरणांमुळे लाखो नागरिक देश सोडून अमेरिकेत निर्वासित म्हणून येत असल्याने संकट वाढल्याचेही अमेरिकेने म्हटले आहे. अमेरिकेने व्हेनेझुएलाच्या दोन प्रमुख गुन्हेगारी गटांना परदेशी दहशतवादी संघटना म्हणून घोषित करून ही कारवाई कायदेशीर असल्याचे भासवण्याचा प्रयत्न केला आहे.**

### ➢ राष्ट्राध्यक्षाला पत्नीसह घेतले ताब्यात
**दरम्यान, अमेरिकेने काराकासमध्ये किमान सात शक्तिशाली स्फोट घडवून आणले. यामध्ये ड्रोन, क्षेपणास्त्रे आणि रॉकेटचा वापर करण्यात आला. या हल्ल्यात व्हेनेझुएलाचे लष्करी तळ, नौदल तळ आणि महत्त्वाच्या सरकारी इमारतींना लक्ष्य करण्यात आले आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दावा केला आहे की, या मोहिमेत व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो आणि त्यांची पत्नी सिलीया फ्लोरेस यांना ताब्यात घेऊन देशाबाहेर नेण्यात आले आहे. या हल्ल्यामुळे काराकासमध्ये पूर्णपणे ङ्गब्लॅकआउटफ(वीजपुरवठा खंडित) झाला असून शहरात धुराचे लोट दिसत आहेत. व्हेनेझुएला सरकारने याला ङ्गसाम्राज्यवादी हल्लाफम्हटले असून देशात आणीबाणी घोषित केली आहे. अमेरिकेने अमली पदार्थांच्या तस्करीविरुद्धचे युद्ध असल्याचे म्हटले असले, तरी जागतिक स्तरावर यावरून मोठे राजकीय वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.**

# छत्तीसगडमध्ये सुरक्षा दल–नक्षलवाद्यांमध्ये चकमक

### १४ नक्षलवादी ठार; पहाटे ५ वाजल्यापासून अधूनमधून गोळीबार



वृत्तसंस्था । बिजापूर

छत्तीसगडमधील सुरक्षा दलांना त्यांच्या नक्षलविरोधी मोहिमेत मोठे यश मिळाले आहे. बिजापूर जिल्ह्याच्या दक्षिणेकडील भागात सशस्त्र माओवाद्यांचे अस्तित्व असल्याची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी शोध मोहीम सुरू केली. पहाटे ५ वाजल्यापासून डीआरजी आणि माओवाद्यांमध्ये अधूनमधून गोळीबार सुरू आहे. आतापर्यंत चकमकीच्या ठिकाणावरून दोन माओवाद्यांचे मृतदेह सापडले आहेत.

किस्ताराम पोलिस स्टेशन परिसरातील पामलूरच्या जंगलात ही चकमक झाली. ठार झालेल्या नक्षलवाद्यांमध्ये कोंटा एरिया कमिटीचे सचिव सचिन मंगाडू यांचा समावेश आहे. सुकमाचे पोलिस अधीक्षक किरण चव्हाण हे सतत या कारवाईवर लक्ष ठेवून आहेत. चकमकीच्या ठिकाणावरून एके–४७ आणि इन्सास रायफलसह स्वयंचलित शस्त्रेही जप्त करण्यात आली आहेत. इतर ठार झालेल्या नक्षलवाद्यांची ओळख अद्याप पटवली जात आहे.

### ➢ २०२५ मध्ये २८५ नक्षलवादी ठार
२०२५ मध्ये छत्तीसगडमध्ये सुरक्षा दलांसोबत झालेल्या विविध चकमकींमध्ये २८५ नक्षलवादी मारले गेले. यापैकी २५७ नक्षलवादी बस्तर विभागात मारले गेले, ज्यामध्ये विजापूरसह सात जिल्हे समाविष्ट आहेत, तर रायपूर विभागातील गरियाबंद जिल्ह्यात आणखी २७ नक्षलवादी मारले गेले. यापूर्वी, २० डिसेंबर रोजी, सुरक्षा दलांनी सुकमामध्ये शस्त्रे आणि दारूगोळ्याचा मोठा साठा जप्त केला होता.

**एकूण १४ मृतदेह जप्त**

आयजी बस्तर पी. सुंदरराज यांच्या मते, शोध मोहिमेदरम्यान आतापर्यंत चकमकीच्या ठिकाणावरून दोन माओवाद्यांचे मृतदेह जप्त करण्यात आले आहेत. त्यांनी सांगितले की, बस्तर रेंजमध्ये नक्षलविरोधी कारवाईदरम्यान सुरक्षा दलांना एकूण १४ नक्षलवाद्यांचे मृतदेह सापडले आहेत. १४ माओवाद्यांचे मृतदेह सापडले आहेत, ज्यात दोन विजापूर जिल्ह्यातील आणि १२ सुकमा जिल्ह्यातील आहेत. चकमकीच्या ठिकाणाहून मोठ्या प्रमाणात शस्त्रे, ज्यात एके–४७, इन्सास रायफल्स आणि एसएलआर रायफल्स

(पान २ वर)

## थोडक्यात

### राज्यात थंडी–पावसाचा खेळ सुरूच
**मुंबई ।** राज्यात दोन दिवसांपासून ढगाळ वातावरण पाहायला मिळाले तरीही गारठा कायम होता. तसेच मुंबईसह अनेक भागात हलक्या स्वरूपाचा पाऊस देखील बरसला. यामुळे पुढील काही दिवस तापमानात चढ–उतार राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. राज्यात ढगाळ वातावरण पाहायला मिळाले. या ढगाळ वातावरणाचा परिणाम थंडीवर झाला. नाशिक, निफाड, मुंबई, पुणे, मराठवाडा, विदर्भात थंडीचा कडाका काहीसा कमी झाला आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार तापमानात चढ–उतार कायम राहणार आहे. अनेक ठिकाणी पारा १० अंशाच्या खाली उतरला आहे. तापमानात होणाऱ्या या सततच्या बदलामुळे नागरिक हैराण झाले आहेत.

### न्यूझीलंडविरुद्धच्या वनडे मालिकेसाठी भारतीय संघ जाहीर
**मुंबई ।** न्यूझीलंडविरुद्ध होणाऱ्या आगामी तीन सामन्यांच्या वनडे मालिकेसाठी भारतीय निवड समितीने टीम इंडियाच्या १५ सदस्यीय संघाची घोषणा केली आहे. दक्षिण आफ्रिका दौऱ्यात दुखापतीमुळे बाहेर असलेल्या शुबमन गिलने संघात पुनरागमन केले असून, तोच या मालिकेचे नेतृत्व करणार आहे. त्याचबरोबर उपकर्णधार श्रेयस अय्यरचेही बऱ्याच कालावधीनंतर संघात पुनरागमन झाले आहे. नियमित कर्णधार शुबमन गिल दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत दुखापतग्रस्त झाल्यामुळे खेळू शकला नव्हता. त्याच्या अनुपस्थितीत के.एल. राहुलने कर्णधारपदाची धुरा सांभाळली होती.

### ५०० रुपयांच्या नोटा मार्च २०२६ पासून बंद होणार?
**नवी दिल्ली ।** सध्या फेसबुक, व्हॉट्सप आणि इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक मेसेज वेगाने व्हायरल होत आहे, ज्यामध्ये असा दावा केला जात आहे की, भारतीय रिझर्व्ह बँक मार्च २०२६ पासून ५०० रुपयांच्या नोटा चलनातून बाद करणार आहे. इतकेच नाही, तर एटीएममधूनही या नोटांची देवाणघेवाण बंद केली जाईल, असेही या मेसेजमध्ये म्हटले आहे. मात्र, या बातमीत तथ्य किती? केंद्र सरकार आणि पीआयबीने याबाबत मोठे स्पष्टीकरण दिले आहे. काय आहे व्हायरल दावा?– व्हायरल होत असलेल्या पोस्टमध्ये असे म्हटले आहे की, मार्च २०२६ नंतर ५०० रुपयांच्या नोटा हळूहळू चलनातून बाहेर काढल्या जातील. २०१६ मध्ये झालेल्या नोटाबंदीच्यां आठवणी ताज्या असल्याने, या मेसेजमुळे सर्वसामान्यांमध्ये चिंतेचे आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# महानगरपालिका निवडणुकीत बिनविरोध विजयावर आता प्रश्नचिन्ह!

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्यात महानगरपालिका निवडणुकांचा धुराळा उडत असतानाच एक मोठी बातमी समोर येत आहे. १५ जानेवारीला होणाऱ्या मतदानापूर्वीच महायुतीचे तब्बल ७० उमेदवार बिनविरोध निवडून आले असले, तरी या विजयावर आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.**

### ➢ विरोधकांचे आरोप अन् राजकीय रणकंदन
ठाणे, कल्याण–डोंबिवली आणि जळगाव यांसारख्या शहरांमध्ये महायुतीला मिळालेल्या या बिनविरोध यशावर विरोधकांनी जोरदार आक्षेप घेतला आहे. शिवसेना (ठाकरे गट) नेते संजय राऊत यांनी हा लोकशाहीचा खून असून उमेदवारांना ५ ते १० कोटींचे आमिष दाखवण्यात आले, असा गंभीर आरोप केला आहे. तर ठाण्यात मनसेचे अविनाश जाधव यांनी निवडणूक अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत निदर्शने केली आहेत. राज ठाकरे यांनीही महापालिका निवडणुकीच्या इतिहासात असे पहिल्यांदाच घडल्याचे म्हणत आश्चर्य व्यक्त केले आहे.

राज्य निवडणूक आयोगाने या सर्व प्रकरणांची सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले असून, चौकशी पूर्ण होईपर्यंत या प्रभागांमधील अधिकृत निकाल जाहीर केले जाणार नाहीत.

निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे की, १५ जानेवारीला मतदान आणि १६ जानेवारीला मतमोजणी होणार असली, तरी ज्या जागांवर उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत, त्यांचा अधिकृत निकाल तूर्तास राखून ठेवला जाईल. स्थानिक प्रशासनाकडून या निवडींचा सविस्तर अहवाल मागवण्यात आला आहे. जोपर्यंत हा अहवाल सादर होत नाही आणि आयोगाचे समाधान होत नाही, तोपर्यंत या प्रभागांमधील निकाल जाहीर केले जाणार

(पान २ वर)

# भारतात केएफसी, पिझ्झा हट चालवणाऱ्या कंपन्यांचे विलीनीकरण

वृत्तसंस्था । दिल्ली

देवयानी इंटरनॅशनल आणि सॅफायर फूड्सच्या शेअर्समध्ये २ जानेवारी मोठ्या प्रमाणात व्यवहार होत असल्याचे पाहायला मिळत आहे. देवयानी इंटरनॅशनलच्या शेअर्समध्ये आज ८ टक्क्यांहून अधिक वाढ झाली. बीएसईवर या शेअरची किंमत प्रति शेअर १५९.४५ रुपयांवर पोहोचली आहे. दरम्यान, सॅफायर फूड्सचे शेअर्स जवळजवळ ६ टक्क्यांनी घसरून प्रति शेअर २४६.८० रुपयांवर आले आहेत. या दोन्ही कंपन्या भारतात अमेरिकेतील यम ब्रँडच्या पिझ्झा हट आणि केएफसी फ्रँचायझी चालवतात. या दोन्ही कंपन्यांचे विलीनीकरणची बातमी समोर आल्यामुळे शेअर्सच्या किमतींमध्ये चढ–उतार दिसून येत आहेत.

# दोन लाखांपर्यंत पीक कर्ज, अन्य शेती व्यवहारावरील मुद्रांक शुल्क माफ

वृत्तसंस्था । मुंबई

शेतकऱ्यांना शेती आणि पीक कर्जाशी संबंधित २ लाखांपर्यंतच्या व्यवहारांवरील मुद्रांक शुल्क १ जानेवारी २०२६ पासून पूर्णतः माफ करण्यात आले आहे. यासंदर्भात शासन निर्णय महसूल आणि वन विभागाने जारी केला आहे. यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंतच्या शेती अथवा पीक कर्जाशी संबंधित निष्पादीत केलेल्या अधिस्वीकृती, रोखपत्र करारनामा, हक्कविलेख निक्षेप, हडप, तारण अथवा तारण गहाण, हमीपत्र गहाणखत, प्रतिभूती बंधपत्र, गहाणखत, गहाणाचे सूचनापत्र किंवा घोषणापत्र किंवा यास संलग्न अशा कोणत्याही संलेखावर उक्त अधिनियमांतर्गत आकारणी योग्य असलेले मुद्रांक शुल्क १ जानेवारी २०२६ पासून पुढील आदेशापर्यंत पूर्णतः माफ करत असल्याचे शासन आदेशात म्हटले आहे.



**राज्य सरकारकडून शेतकरी कर्जमाफीबाबत जुलै २०२६ नंतर निर्णय घेण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. त्याच प्रमाणे याआधी अवकाळी तसेच अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाईही सरकारकडून शेतकऱ्यांना वितरित करण्यात आल्याचे सरकारचे म्हणणे आहे. या पार्श्वभूमीवर दोन लाखांपर्यंतच्या शेती व्यवहारावरील मुद्रांक शुल्क माफ करण्याचा सरकारचा निर्णय शेतकऱ्यांसाठी दिलासादायक आहे.**

# बंगालमध्ये जमावाचा पोलिसांवर हल्ला

## संदेशखालीतील कायदा–सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

वृत्तसंस्था । कोलकाता

**तृणमूल काँग्रेसच्या एका कार्यकर्त्याला अटक केल्यानंतर संतप्त जमावाने पोलिसांवर हल्ला केल्याने पश्चिम बंगालच्या उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील संदेशखाली परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेत सहा पोलीस जखमी झाले असून पोलिस वाहनाचेही नुकसान झाले आहे. नजात पोलीस ठाण्याचे पथक शुक्रवारी रात्री संदेशखाली ब्लॉकमधील बोयरमारी गावात टीएमसी कार्यकर्ता मुसा मोल्ला याला अटक करण्यासाठी गेले होते.**



मत्स्यपालनासाठी वापरल्या जाणाऱ्या परिसरातील जलसाठ्यांवर बेकायदेशीरपणे ताबा मिळवल्याच्या आरोपाखाली ही कारवाई करण्यात आली होती. मोल्लाला घरातून ताब्यात घेऊन पोलीस वाहनात नेत असताना, गावकऱ्यांच्या एका

(पान २ वर)

**भाजप नेते सजल घोष यांनी या घटनेवर तीव्र टीका करत, पोलिसांवरील हल्ला हा ममता बॅनर्जी सरकारच्या काळातील टीएमसी कार्यकर्त्यांची निराशा आणि निर्लज्जपणा आधोरेखित होत असल्याचा आरोप केला. याउलट, टीएमसीचे प्रवक्ते अरूप चक्रवर्ती यांनी पोलिसांवरील हल्ला निंदनीय असल्याचे सांगत, पक्ष अशा कृत्यांना पाठिंबा देत नसल्याचे स्पष्ट केले. सलग हिंसक घटनांमुळे संदेशखाली पुन्हा एकदा संवेदनशील ठरत असल्याचे चित्र आहे.**

# काँग्रेसची मोठी घोषणा; १० जानेवारीपासून देशव्यापी मनरेगा बचाव संग्राम

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

व्हीबी जी–राम–जी कायद्याविरोधात काँग्रेस १० जानेवारी ते २५ फेब्रुवारीदरम्यान देशव्यापी मनरेगा बचाव संग्राम सुरू करणार असल्याची घोषणा शनिवारी करण्यात आली. या आंदोलनाच्या माध्यमातून काँग्रेसने नवीन कायदा मागे घ्यावा, मनरेगाला पुन्हा हक्क–आधारित रोजगार हमी कायदा म्हणून पुनर्संचयित करावे, तसेच कामाचा हक्क आणि पंचायतींचे अधिकार अबाधित ठेवावेत, अशी मागणीही करण्यात आली आहे.

संयुक्त पत्रकार परिषदेत काँग्रेसचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल आणि जयराम रमेश यांनी सांगितले की, जी–राम–जी कायद्यामुळे केंद्र सरकारकडे संपूर्ण केंद्रीकरण झाले असून, रोजगार हा आता नागरिकांचा कायदेशीर हक्क राहिलेला नाही. नवीन कायद्यानुसार रोजगाराची हमी कमी होत असून, याविरोधात न्यायालयात आव्हान देण्याचीही गरज निर्माण होऊ शकते, असा दावा त्यांनी केला.

इंडिया आघाडीतील घटक पक्षांची सत्ता असलेल्या राज्यांमध्ये या कायद्याची अंमलबजावणी होईल का, या प्रश्नावर वेणुगोपाल यांनी सांगितले की, काँग्रेस सर्व मित्रपक्षांशी चर्चा करून पुढील रणनीती ठरवेल. विकसित भारत–रोजगार आणि उपजीविका हमी अभियान विधेयक म्हणजेच जी–राम–जी विधेयकाला डिसेंबरमध्ये संसदेत मंजुरी मिळाली असून, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी २१ डिसेंबर रोजी त्याला मंजुरी दिली. हा कायदा ग्रामीण रोजगार हमी कायदा मनरेगाच्या जागी लागू करण्याचा प्रयत्न असल्याचे काँग्रेसचे म्हणणे आहे.

## संपादकीय

### मध्यममार्गी

आपले शेजारी वेगवेगळ्या प्रकारचे आहेत. कोणी चांगले आहेत किंवा असे आहेत की ज्यांच्यामुळे आपले कोणते नुकसान होणार नाही. अशा शेजाऱ्यांना मदत करण्याचा भारताचा स्वभाव आहे. शेजारी खरेच चांगला आहे याची आम्हाला खात्री झाली तर आम्ही तेथे गुंतवणूकही करतो. त्यांना मदत करतो, त्यांच्याशी सहकार्य वाढवतो, असे भारताचे परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी म्हटले आहे. श्रीलंकेचा त्यांनी उल्लेख केला. आर्थिक संकटात सापडलेल्या श्रीलंकेला मदत करताना आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे अगदीच आस्ते कदम सुरू असताना भारताने त्या देशाला अगदी तत्परतेने मदत केली. याची श्रीलंकेनेही जाण ठेवली आणि त्याचे प्रतिबिंब उभय देशांच्या संबंधांत स्पष्टपणे दिसते. पाकिस्तानकडून समंजस वागणुकीची अपेक्षा नाही. दहशतवादाचा कारखाना जोपर्यंत सुरू आहे तोपर्यंत त्या देशाशी संबंध सुरळीत होणे शक्य नाही. बांगलादेशच्या संदर्भात मात्र स्थिती हाताबाहेर जाण्याच्या आतच हालचाल करत भविष्यातील अडचणी आटोक्यात ठेवण्याचा किंवा संयमित करण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो. जयशंकर यांनी बांगलादेशच्या माजी पंतप्रधान खालिदा झिया यांच्या अंत्यसंस्काराच्या निमित्ताने बांगलादेशला दिलेली भेट आणि त्यावेळी खालिदा यांचे पुत्र आणि राजकीय उत्तराधिकारी तारिक रहमान यांची घेतलेली भेट हे भारताचे योग्य पाऊल आहे. ही भेट केवळ शोकसंदेश देण्यासाठी झालेली नाही, तर भारत बांगलादेशशी व विशेषत: तारिक रहमान यांच्या बीएनपी या पक्षाशी आपले संबंध वेगळ्या पद्धतीने पुन्हा मांडू इच्छितो हा संदेश त्यातून दिला गेला. बांगलादेशात येत्या १२ फेब्रुवारी रोजी निवडणुका होणार आहेत. तेथील जनमत सध्या तारिक रहमान यांच्या बीएनपी या पक्षाला अनुकूल आहे. बांगलादेशचे नवे पंतप्रधान तेच असतील असा स्पष्ट कौल तेथील जनता देईल अशी स्थिती आहे. बीएनपी पक्षाचा कट्टर राजकीय प्रतिस्पर्धी असलेल्या आवामी लिग पक्षाच्या नेत्या शेख हसीना यांना देशातून पळ काढावा लागला आहे. त्या भारतातच वास्तव्याला आहे. त्यांच्या पक्षाला निवडणूक लढण्यास मनाई असल्याने तारिक यांना कोणाचे आव्हान नाही. हसीना यांच्या पक्षाशी भारताचे कायमच सलोख्याचे संबंध राहिले आहेत. याउलट बीएनपी संदर्भात भारत कायमच सावध राहिला आहे. हसीना यांच्या राजवटीत बांगलादेशात काय घडले आणि त्यांच्यावर काय आरोप आहेत हा त्या देशाचा अंतर्गत मुद्दा आहे. दुर्दैवाने तेथील विद्यमान काळजीवाहू राजवटीने आणि त्यांच्यावर असलेल्या जिहादी गटांच्या दबावाने हसीनांप्रती असलेल्या भारताच्या सहानुभूतीलाच राजकीय मुद्दा बनवला आहे. त्याचा वापर करून भारतविरोधी वातावरण तयार करण्यात आले आहे. बांगलादेशातील जी विद्यमान पर्यायी व्यवस्था आहे त्याच्या स्थापनेत देशातला सगळ्यांत प्रमुख विरोधी पक्ष म्हणून बीएनपीचाही हातभार आहे; पण या पक्षाने कट्टरवाद्यांच्या कच्छपी लागू नये यासाठीही तारिक रहमान यांच्याशी भारताने सुरू केलेला औपचारिक व्यवहार महत्त्वाचा ठरतो. बीएनपीचे पूर्वीपासून कट्टरवाद्यांशी चांगले संबंध राहिले आहेत. भारताने त्यामुळेच या पक्षाप्रती फारसे ममत्व दाखवले नव्हते. विविध आर्थिक गुन्ह्यांमध्ये अटकेच्या आणि शिक्षेच्या भीतीने तारिक रहमान यांना देश सोडावा लागला होता. सतरा वर्षांनंतर ते बांगलादेशात परतले आहेत. दरम्यानच्या काळात बरेच बदल जगात आणि त्यांच्या देशातही झाले आहेत. याची तारिक यांनी निश्चितच नोंद घेतली असणार. त्यामुळेच त्यांनी ङ्कबांगलादेश फर्स्टफ्च्ा नारा दिला आहे. त्यांनी सगळ्यांना सोबत नेण्याचे म्हटले आहे आणि कट्टरवाद्यांना हायसे वाटावे किंवा त्यांनी उन्माद करावा असे कोणतेही विधान अद्याप केलेले नाही. थोडक्यात तारिक रहमान यांनी मध्यममार्गानेच ते जातील, कोणत्या एका बाजूला झुकणार नाहीत असे स्पष्ट केले असल्यामुळे भारतासाठी ही सकारात्मक बाब आहे.

# महापालिका निवडणुकीत गुन्हेगारी पार्श्वभूमीचे २४ जण शहरातून हद्दपार!

## ● जळगाव उपविभागीय दंडाधिकाऱ्यांचा आदेशाचा दणका

प्रतिनिधी । जळगाव

**अगामी जळगाव महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने शहरात कायदा व सुव्यवस्था आबाधित राहुन शांतता रहावी याकरिता गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले जळगाव शहरातील २४ जणांना शहरातून हद्दपार करण्यात आले. उपविभागीय दंडाधिकारी जळगाव, भाग जळगाव यांच्या आदेशानुसार ही कार्यवाही करण्यात आली आहे.**



● जळगाव शहरातून निघुन जाण्याचा आदेश उपविभागीय दंडाधिकारी जळगाव भाग जळगाव यांच्याकडून पारित करण्यात आले आहे. तसेच वर नमुद इसमांना दि. १५ रोजी जळगाव महानगरपालिका निवडणुकीचे मतदानाकरीता २ तास जळगाव शहरात येण्याची परवानगी देण्यात आली आहे. मात्र, मतदान झालेनंतर सदर इसम हे जळगाव शहर सोडुन जातील.

जळगाव महानगरपालिका निवडणूक काळात जळगाव शहरात कायदा व सुव्यवस्था आबाधित राहुन शांतता रहावी याकरिता जळगाव शहरातील गुन्हेगार यांचेविरुद्ध जळगाव उपविभागीय पोलीस अधकारी कार्यालया, जळगाव भाग कडून उपविभागीय दंडाधिकारी जळगाव भाग जळगाव यांचे कडे मनपा जळगाव निवडणूक काळात हद्दपार करण्याकरिता प्रस्ताव पाठविण्यात आले होते. त्यापैकी एमआयडीसी पोस्टे हद्दीतील १८ गुन्हेगार तसेच जळगाव शहर पोस्टे हद्दीतील ६ असे एकुण २४ गुन्हेगार यांना जळगाव शहरातील अगामी महानगरपालिका निवडणुका काळात कायदा व सुव्यवस्था आबाधित राहुन शांतता रहावी याकरिता ही कार्यवाही करण्यात आली आहे. दि. ४ जानेवारी रोजीचे रात्री ००.०१ वा. पासुन ते दि. १७ जानेवारी २०२६ चे सकाळी ८ वा. पावेतोच्या कालावधीत जळगाव शहराच्या हद्दीमध्ये कोणत्याही प्रकारे शिरकाव करण्यास मनाई करण्यात आली आहे.

# भिक्खुनी संघाची आज जळगाव शहरात धम्मदेसना

प्रतिनिधी । जळगाव

**बुद्ध चतु परिसा भिक्खुनी संघ, थायलंड शाखा जळगाव व अजिंठा हौसिंग सोसायटीतर्फे ४ जानेवारी रोजी सुमारे १३० भिक्खुनी यांच्या उपस्थितीत सकाळी नऊ वाजता कृषी उत्पन्न बाजार समिती ते अजिंठा चौफुलीपर्यंत भव्य धम्म रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.**



रॅली समाप्तीनंतर अजिंठा हौसिंग सोसायटीतील प्रत्येक घरी भिक्खुनी जाऊन चारिका करणार आहे. दुपारी ११ वाजता पूज्य भिक्खुनी विसुत्ती यांना (थायलंड) यांचा नागरी सत्कार तसेच जाहीर धम्मदेसना होणार आहे. या समारंभास जिल्हाभरातून बौद्ध जनता मोठ्या संख्येने येणार आहेत. समारंभाच्या अनुषंगाने सर्व तयारी पूर्ण झाली आहे. समारंभाच्या यशस्वितेसाठी महिला वर्ग शहराच्या विविध भागात जाऊन प्रचार करीत आहेत. जळगाव शहरात येवढ्या मोठ्या संख्येने बौद्ध भिक्खुनी प्रथमच येत असल्याने बौद्ध जनतेत कार्यक्रमाविषयी उत्सुकता निर्माण झाली आहे. या समारंभास जनतेने शक्यतो पांढरे वस्त्र परिधान करून यावे,असे आवाहन ज्येष्ठ साहित्यिक जयसिंग वाघ, ॲड. आनंद कोचुरे, चेतन नन्नवरे, दिलीप सपकाळे, ज्योती भालेराव, कविता सपकाळे, संघमित्रा चव्हाण यांनी केले आहे.

# दिव्यांगांच्या विकासावर ‘सक्षम’ अधिवेशनात चर्चा

प्रतिनिधी । जळगाव

दिव्यांगांच्या कल्याणासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करणाऱ्या सक्षमच्या जळगाव शाखेच्यावतीने आयोजित एकदिवसीय अधिवेशन उत्साहात पार पडले. यामध्ये दिव्यांगांच्या विकासावर चर्चा करण्यात आली.

प्रमुख अतिथी म्हणून सक्षमच्या राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्या डॉ. प्रीती पोहेकर, केशवस्मृती प्रतिष्ठान सेवा समूहाचे अध्यक्ष डॉ. भरत अमळकर उपस्थित होते. सक्षम देवगिरी प्रांतचे उपाध्यक्ष डॉ. धर्मेंद्र पाटील यांनी प्रास्ताविकातून अधिवेशनाचा उद्देश स्पष्ट केला. डॉ. प्रीती पोहेकर यांनी सक्षमची पार्श्वभूमी मांडली.

अध्यक्षीय मार्गदर्शनात डॉ. भरत अमळकर यांनी दिव्यांगांना दैनंदिन जीवन जगताना त्यांना कोणत्या गरजा अधिक महत्त्वाच्या आहेत त्याकडे लक्ष देणे गरजेचे असल्याचे नमूद केले.

# स्नेह संमेलनामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मिळते संधी: उपायुक्त गाडे

प्रतिनिधी । जळगाव

**स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्त कलागुणांना वाव मिळतो, या कलेचे दर्शन त्यांच्या पाल्यांना होत असते. विद्यार्थ्यांसाठी स्नेहसंमेलन एक हक्काचे व्यासपीठ असते. त्यामुळे स्नेहसंमेलन होणे गरजेचे आहे, असे मत धर्मदाय उपआयुक्त मोहन गाडे यांनी बहिणाबाई विद्यालयाच्या स्नेहसंमेलनाच्या आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना व्यक्त केले.**



ते पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी मोबाईलवर गेम न खेळता क्रीडांगणावर खेळ खेळावेत. इंटरनेट, टीव्ही यांच्यापासून दूर होऊन अभ्यास करावा, असे मार्गदर्शन त्यांनी केले. श्री.गाडे यांच्या हस्ते दीपप्रज्वल करून उद्घाटन झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विठ्ठल मंदिराचे विश्वस्त विलास हरी चौधरी तर संस्थेचे अध्यक्ष बंडू काळे, जनार्दन रोटे, लीलाधर नारखेडे, ज्ञानदेव काळे, समन्वयक प्रतिभा खडके, डॉ. विलास नारखेडे आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी विविध रंगांची उधळण केली. एकापेक्षा एक सदाबहार कला सादर करून प्रेक्षकांना खिळवून ठेवले.

यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक डॉ. विलास नारखेडे, डॉ. प्रतिभा राणे, विशाल पाटील, स्वाती कोल्हे सीमा चौधरी संतोष पाटील, संतोष सोनार, दिनेश चौधरी, अजय कुवर, दुर्गादास कोल्हे, जगदीश नेहेते, उदय नेमाडे इत्यादींनी खूप परिश्रम घेतले. महाराष्ट्राची संस्कृती आकर्षक नृत्य, देशभक्तीपर गीते आणि विनोदी नाटकांची सादरीकरण करून आपल्या कलागुणांनी तेजश्री जगताप, खुशी सोनवणे, नीता बारी, मिनल महाले, राम महाजन, गौरव गोसावी यांनी उपस्थित्यांची मने जिंकली.

या सोहळ्याला विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# १४ जानेवारीपर्यंत जमाव बंदी लागू

प्रतिनिधी । जळगाव

**आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची मतमोजणी तसेच विविध स्वरुपाची सण, उत्सव, थोर पुरुषांच्या जयंती या साजऱ्या होणार असल्याने प्रभारी अपर जिल्हा दंडाधिकारी वैशाली चव्हाण यांनी दि.१४ जानेवारीपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.**

जमाव बंदीचे आदेश सरकारी कार्यक्रम, अंत्ययात्रा, लग्न समारंभ व धार्मिक मिरवणुकीसह अन्य कार्यक्रमांना लागू नसल्याचे आदेशात म्हटले आहे.

# ‘आयतं पोयतं सख्यान’ एकपात्रीने प्रेक्षकांना हसविले

प्रतिनिधी । जळगाव

भंवरलाल आणि कांताबाई जैन आणि परिवर्तन यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या मैत्र महोत्सवात दुसऱ्या दिवशी अभिनेते प्रवीण माळी यांनी अहिराणी भाषेतील ‘आयत पोयत सख्यान’ हा एकपात्री प्रयोग सादर करून प्रेक्षकांना मनमुराद हसवले.

या महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी प्रवीणकुमार सिंग, प्रभावती पाटील, शरद पांडे, नंदलाल गादिया, ज्ञानेश्वर शेंडे, डॉ. रेखा महाजन, विनोद पाटील व शिरीष बर्वे हे प्रमुख पाहुणे होते.

याप्रसंगी फूड ब्लॉगर विक्रम संतोष मोरे यांचा सत्कार प्रवीणकुमार सिंग यांच्या हस्ते करण्यात आला. प्रवीण माळी यांनी प्रयोगाच्या दरम्यान बोलीभाषा. त्यांची खान्देशातील मैत्र महोत्सवात आसक्त पुणे या संस्थेचे अहिराणी नाटक आईना वेळ : सायंकाळी ६:३० वाजता एम्फी थिएटर, भाऊंचे उद्यान येथे होईल.

वैशिष्ट्य, त्यांचा लहेजा, त्याचा इतिहास, खान्देशी संस्कृती अशा अनेक गोष्टींवर भाष्य करत एक सुंदर एकपात्री प्रयोग सादर केला.

# उत्तरेकडील परदेशी पाहुण्यांचे जिल्ह्यात आगमन!

प्रतिनिधी । जळगाव

उत्तरेकडील देशांमध्ये बर्फवृष्टी सुरू झाल्यामुळे नदी, नाले गोठून गेले असून, त्यामुळे हिमालय पर्वत व उत्तरेकडील देशांमधील पक्षी तब्बल तीन हजार किमीचा प्रवास करून जिल्ह्यात दाखल झाले आहेत. जिल्ह्यातील लहान-मोठ्या पाणवठ्यांवर विदेशी पक्ष्यांचे थवे आढळून येत आहेत.

दरवर्षी स्थलांतरीत पक्षी हे जिल्ह्यात दाखल होत असतात, यंदाही जिल्ह्यात नोव्हेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून पक्ष्यांच्या आगमनास सुरुवात झाली आहे. त्यानंतर मात्र हे पक्षी पुन्हा ३ ते ४ हजार किमीचा परतीचा खडतर प्रवास सुरु करतात.

## ● कुठून-कुठून येतात पक्षी?

जिल्ह्यात प्रामुख्याने युरोप खंडातील ग्रीस, ऑस्ट्रीया, हंगेरी, तुर्की या देशांसह रशिया, सैबेरीया, मंगोलीया, तिबेट या देशांसह हिमालयातील लद्दाखच्या भागाकडून स्थलांतरीत पक्षी जिल्ह्यात दाखल होत असतात. पक्षी अभ्यासक राहुल सोनवणे, प्रसाद सोनवणे यांच्यासह चातक फाऊंडेशनचे अनिल महाजन व अनेक पक्षीप्रेमी निरीक्षणासाठी जलाशयांवर ठाण मांडून असून, पक्ष्यांची नोंद घेत आहेत.

जिल्ह्यात आतापर्यंत नॉर्दन पिनटेल, कॉमन टील, ब्राह्मणी बदक इसाबेलिन श्राईक, ब्लॅक टेल्ड गॉडविट, कॉमन हाऊस मार्टिन, युरेशियन क्रेग मार्टीन, अल्पाइन स्विफ्ट, रेडस्टार्ट हे पक्षी जिल्ह्याच्या पाणवठ्यांवर आढळून आला आहेत. पॅसिफिक गोल्डन प्लोवर (सोन चिखल्या) आणि जॅक स्नाईप या दुर्मीळ पाहुण्यांचा समावेश आहे.

जिल्ह्यातील उथळ पाणवठ्यांवर हे पक्षी दाखल होत असतात, तरी जळगाव जिल्ह्यातील हतनूर धरण, मेहरूण तलाव, चारठाणा येथील भवानी तलाव व घाटी तलावासह जळगाव शहरातील मेहरूण तलाव, गिरणा नदी परिसर, शेळगाव बॅरेज या ठिकाणी मोठ्या प्रमाणात विदेशी पक्षी दाखल होत असतात.

# घरफोडी करणारा अट्टल गुन्हेगार जेरबंद; एलसीबीची कामगिरी

प्रतिनिधी । जळगाव

जिल्ह्यासह छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर आणि धुळे अशा तब्बल सात जिल्ह्यांमध्ये दिवसा घरफोड्या करून पोलिसांच्या नाकी नऊ आणणाऱ्या एका अट्टल गुन्हेगाराला जेरबंद करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे.

किशोर तेजराव वायाळ (रा. मेरा बु. ता. चिखली) असे या सराईत चोरट्याचे नाव असून, त्याच्याकडून १ लाख ९७ हजार रुपये किमतीचे ३५ ग्रॅम सोने जप्त करण्यात आले आहे.गेल्या ३ डिसेंबर २०२५ रोजी पहूर पोलीस स्टेशनच्या हद्दीतील तोंडापूर आणि पहूर या गावांमध्ये अज्ञात चोरट्याने भरदिवसा घरफोड्या केल्या होत्या. एकाच दिवशी दोन ठिकाणी झालेल्या या चोरीच्या घटनांमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते. याप्रकरणी घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक यांनी स्थानिक गुन्हे शाखा आणि पहूर पोलिसांचे एक संयुक्त विशेष तपास पथक नेमले होते.

तपास पथकाने तांत्रिक माहिती आणि गोपनीय बातमीदारांचे जाळे विणले होते. या तपासात किशोर वायाळ याचे नाव समोर आले. मात्र, हा आरोपी अत्यंत सराईत असून तो कधीही एका ठिकाणी वास्तव्यास राहत नसे. तो सतत आपली ठिकाणे बदलत असल्याने पोलिसांना चकवा देत होता. पथकाने सलग दोन दिवस त्याच्या हालचालींवर लक्ष ठेवले आणि त्याचा मागावर राहून अखेर त्याला शिताफीने ताब्यात घेतले. पोलिसांनी आरोपीची चौकशी केली असता त्याने पहूरमधील दोन घरफोड्यांसह जामनेर आणि धुळे जिल्ह्यातील सिंदखेडा येथील ३ अशा एकूण ५ मोठ्या घरफोड्यांची कबुली दिली. त्याने चोरलेले सोने संभाजीनगर आणि चिखली परिसरात विकल्याची माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी तो मुद्देमाल हस्तगत केला. या अटकेमुळे अनेक जिल्ह्यांतील घरफोडीच्या गुन्ह्यांची साखळी उघडकीस आली असून, आणखी काही गुन्हे समोर येण्याची शक्यता पोलीस अधीक्षक यांनी व्यक्त केली आहे.

## पान १ वरुन

**छत्तीसगडमध्ये सुरक्षा......**

देखील सापडल्या आहेत. त्यांनी पुढे सांगितले की, ऑपरेशन सुरू असल्याने, सहभागी कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी चकमकीचे नेमके ठिकाण, सहभागी सुरक्षा दलांची संख्या आणि इतर संवेदनशील माहिती सध्या शेअर करता येत नाही. ऑपरेशन पूर्ण झाल्यानंतर ऑपरेशनबाबत सविस्तर माहिती शेअर केली जाईल, असे त्यांनी पुढे सांगितले.

**महानगरपालिका निवडणुकीचा......**

नाहीत. त्यामुळे महापालिका निवडणुकींचा निकाल लांबणीवर पडणार की काय अशी शक्यता वर्तवली जात आहे. एकाच वेळी एवढ्या मोठ्या संख्येने उमेदवार बिनविरोध निवडून येणे ही बाब गांभीर्याने घेत आयोगाने तपासाची चक्रे फिरवली आहेत. प्रामुख्याने विरोधी उमेदवारांवर माघार घेण्यासाठी दबाव टाकला गेला का?, उमेदवारांना काही आर्थिक आमिष दाखवून मैदानातून हटवण्यात आले का?, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक विरोधकांचे अर्ज अवैध ठरवले का? या मुद्द्यांवर चौकशी होणार आहे.

**बंगालमध्ये जमावाचा......**

गटाने अचानक दगडफेक सुरू करत पोलिसांवर हल्ला केला. या हल्ल्यात सहा पोलीस जखमी झाले. जखमींना तातडीने स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आले असून उपचारानंतर त्यांना घरी सोडण्यात आले आहे. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याचे लक्षात येताच पोलिसांनी अतिरिक्त कुमक मागवून जमाव पांगवला, त्यानंतर मोल्लाला सुरक्षितपणे पोलीस ठाण्यात नेण्यात आले. दरम्यान, जमावाला चिथावणी दिल्याच्या आरोपाखाली ग्रामपंचायत प्रमुखासह दोन स्थानिक टीएमसी नेत्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. या घटनेने संदेशखालीतील कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# जि.प.च्या पाणीपुरवठा विभागाकडून टंचाईआराखड्यात ५१२ गावांचा समावेश

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यात यंदा मुबलक झालेला पाऊस त्यातच दिवाळीनंतर देखील अतिवृष्टीचा तडाखा बसल्याने एकीकडे खरीप हंगामाचे नुकसान झाले आहे. मात्र, दुसरीकडे जिल्हाभरात जि.प.च्या पाणीपुरवठा विभागाकडून टंचाईआराखड्यात ५१२ गावांचा समावेश करण्यात आला आहे.**




## ● विहीर अधिग्रहणासाठी ३ कोटी ५८

पाणीटंचाईवर मात करण्यासाठी व उपाययोजना म्हणून जि. पच्या पाणी पुरवठा विभागाकडून टंचाई आराखड्याचे काम हाती घेण्यात आले होते. यंदा टंचाई आराखड्यात ५१२ गावे संभाव्य पाणीटंचाईत नोंदविण्यात आली आहे उपाय योजना म्हणून या गावांसाठी टैंकर, विहीर अधिग्रीत, कुपनलीका, विधन विहीरी आदी बाबीवर खर्च करण्यासाठी तरतुद करण्यात प्रस्तावित करण्यात आली आहे. विहीर अधिग्रहणसाठी ३ कोटी ५८ लाख तर टैंकरसाठी २ कोटी ६४ लाखांची तरतुद संभाव्य आराखड्यात करण्यात आली आहे.

जि.प.च्या पाणीपुरवठा विभागाकडून तयार करण्यात आलेल्या आराखड्यात यंदा ५१२ गावांचा समावेश आहे. गेल्या दोन वर्षापासून टंचाईच्या आराखड्यातील गावे कमी होत असुन यंदा देखील ती कमी झाली आहे. यंदा जिल्ह्यातील पाणीटंचाईचा आराखडा ९ कोटी ५४ लाखाचा आहे. व षिश म्हणजे दरवर्षी ऑक्टोबर ते डिसेंबर दरम्यान १२५ गावे संभाव्य टंचाईत राहत होती. ती यंदा एक ही नाही. दुसरीकडे जलजीवन मिशनच्या योजनांचे काम निधी अभावी कासवगतीने सुरू असल्याने योजना पुर्णत्वास येण्यास अडचणी आहे. परतीचा पाऊस चांगला झाला असला तरी योजनांची कामे अपुर्ण असल्याने यंदा पाणीटंचाईची संभाव्य गावे समाविष्ट करावी लागली आहे. मात्र ४५० पेक्षा अधिक योजना कार्यन्वीत झाल्याने काहीसा दिलासा मिळाला आहे. त्यामुळे देखील यंदा टंचाईच्या आराखड्याला कात्री लागली असल्याचे सांगण्यात आले आहे. जिल्हाभरात पाणीपुरवठा विभागाच्या अंतर्गत जलजीवन मिशनची कामे युध्दपातळीवर पुर्ण झाली तर आगामी वर्षात जिल्हा पाणीटंचाई मुक्त होण्याच्या मार्गावर आहे. जिल्ह्याच्या पाणीटंचाई आराखड्यात ऑक्टोबर ते डिसेंबर दरम्यान यंदा एक ही गाव संभाव्य टंचाईच्या आराखड्यात नाही. मुबलक पावसामुळे टंचाईच्या झळा यंदा हिवाळ्यात जानवणार नाहीं. मात्र जानेवारी ते मार्च दरम्यान संभाव्य टंचाईत १२७ गावे राहतील असा अंदाज आहे. त्यासाठी ६० विहीरी व कुपनलिका प्रस्तावित करण्यात आल्या आहे. त्यासाठी साधारणतः १ कोटींची तरतुद करण्यात आली आहे. तसेच १५ टैंकर व ४७ विहीरी अधिग्रहीत करण्यासाठी निधीची तरतुद आराखड्यात करण्यात आली आहे.

एप्रिल ते जुन दरम्यान ३८५ गावे टंचाईच्या छायेत जिल्हह्यात दरवर्षी चाळीसगाव, अमळनेर व जामनेर तालुक्यात सर्वाधिक पाणीटंचाईचे सावट असते, त्यामुळे उपाययोजना कराव्या लागतात. मात्र यावर्षी चोपडा, पारोळा, जामनेर, पाचोरा तालुक्यात पाणीटंचाईचे सावट राहणार असल्याचा अंदाज आहे तर चाळीसगाव तालुक्यात यंदा टंचाईचे चटके कमी होतील असा देखील अंदाज आहे. एप्रिल ते जुनदरम्यान जिल्ह्यातील ३८५ गावे संभाव्य टंचाईत आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक सागर काशिनाथ ओतारी व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✽ कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी (मोबा. – ७५८८८१३१३२) (✽ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) E-Mail : dainikshauryamarathi@gmail.com

# इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानतर्फे पंढरपुरात उभारणार खान्देश वारकरी भवन

## बाळासाहेब भदाणेंच्या संकल्पेतून होणार तालुक्यासह खान्देशातील वारकरींची हक्काची सोय

प्रतिनिधी । धुळे

**बोरकुंड येथील इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानतर्फे, पंढरपुर येथे खान्देश वारकरी भवनाचे नुकतेच भूमिपूजन करण्यात आले. प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब भदाणे व सचिव शालिनी भदाणे या विठ्ठलभक्त दाम्पत्याच्या संकल्पेतून उभ्या राहणाऱ्या खान्देश वारकरी भवनाच्या भूमिपूजन समारंभास मित्र परिवार उपस्थित होता.**



पंढरपुर येथे उभारण्यात येणाऱ्या या वारकरी भवनामुळे, धुळे तालुक्यासह खान्देशातील भाविकांना हक्काची सोय होणार आहे. इंदबाई भदाणे प्रतिष्ठान हे गेली अनेक वर्ष सामाजिक आदी क्षेत्रात अग्रेसर आहे. विविध समाजाभिमुख उपक्रमांबरोबर धार्मिक क्षेत्रातही प्रतिष्ठानने आपला ठसा उमटवला आहे. यातच पंढरपुर सारख्या प्रमुख तीर्थस्थळी वारकरी भवन साकारण्याचा विधायक निर्णय घेतल्याने वारकरी बांधवांतून समाधान व्यक्त केले जात आहे. पंढरपुर या तीर्थक्षेत्राला भारताची दक्षिण काशी म्हणुन ओळखले जाते. अवघ्या महाराष्ट्राचे एक चिरंतन स्फूर्तिस्थान असलेल्या विठूमाऊलीचे दर्शन घेण्यासाठी लाखों भाविक येथे हजेरी लावतात. वर्षभर येथे लागलेली भाविकांची रिघ पाहता धुळे तालुक्यासह खान्देशातील भाविकांची काहीशी आबाळ होते.

पंढरपुर येथील चंद्रभागा नदीच्या तीरावर प्रसिध्द इस्कॉन मंदिर परिसराच्या शेजारी हे खान्देश वारकरी भवन साकारणार आहे. या वारकरी भवनाचे नुकतेच भूमिपूजन करण्यात आले. पंढरपूर येथे झालेल्या या भूमिपुजन समारंभ प्रसंगी इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब भदाणे, सचिव शालिनीताई भदाणे यांच्यासह भाजपा जिल्हा उपाध्यक्ष अशोक सुडके, पंढरपुर नगरपालिकेचे नगरसेवक किरण घाडगे, अंबादास पाटील, पं.स.चे माजी उपसभापती देवेंद्र माळी, रोहिणी माळी, रामकृष्ण पाटील, पूजा पाटील, माजी पं.स.सदस्य बाबाजी देसले, ललिता देसले, चांदे उपसरपंच रावसाहेब पाटील, वैशाली पाटील, प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष डॉ. कृष्णा भदाणे, डॉ.

**पंढरी नगरीत धुळे तालुक्यासह खान्देशातील भाविकांसाठी हक्काची सोय व्हावी या उदात्त हेतूने, प्रतिष्ठानचा वारकरी भवन उभारण्याचा मानस होता. प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब भदाणे व सचिव शालिनी बाळासाहेब भदाणे या विठ्ठलभक्त दाम्पत्याच्या प्रयत्नातून ही संकल्पना मूर्तरुप घेत आहे.**

अर्जुन भदाणे, महेश माळी, सामाजिक कार्यकर्ते गणेश पाटील, दोंदवाड उपसरपंच रविबाबा माळी, मोहाडीचे माजी सरपंच पिंटू धनगर, रवि गर्दे, हेमराज गवळी, पुंडलीक भिसे, पवन गवळी, आशिष भदाणे, सनी पाटील, रविंद्र भदाणे, भावेश भदाणे, भिकूबाई भदाणे, ताराबाई पाटील, वंदना पाटील, उषा भदाणे, अनिता पाटील, सुशिल भदाणे, राजेंद्र माळी, युगल अहिरे, दर्शन अहिरे, कुणाल अहिरे, राम देवरे, कृष्णा देवरे आदी उपस्थित होते. अखंड महाराष्टाचे श्रध्दास्थान असलेल्या पंढरी नगरीत वारकरींसाठी हक्काची जागा उपलब्ध करुन देण्याचा संकल्प बाळासाहेब भदाणे व शालिनी भदाणे यांनी सोडल्याबद्दल भाविक वर्गातून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्तीसाठी ३० जानेवारीपर्यंत मुदत

प्रतिनिधी । धुळे

**राज्यातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना देशातील नामांकित शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी देण्यात येणाऱ्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज सादर करण्यासाठी ३० जानेवारीपर्यंत मुदतवाढ दिली आहे.**

देशातील नामांकित शैक्षणिक संस्थामध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी राज्यातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेसाठी सन २०२५-२०२६ साठी विद्यार्थ्यांकडून जुलैपर्यंत अर्ज मागविण्यात आले होते.

परंतु शैक्षणिक संस्थामधील सन २०२५-२०२६ मधील प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली नसल्याने अर्ज ३१ सादर करण्यास ३० जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

**विद्यार्थ्यांनी संकेतस्थळावरुन अर्ज डाऊनलोड करुन तो परिपूर्ण व आवश्यक त्या कागदपत्रासह पोस्टाने किंवा समक्ष समाज कल्याण आयुक्तालय, ३ चर्च रोड, पुणे ४११००१ येथे सादर करावे. अर्जाचा नमुना व अधिक माहिती https://www.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त श्री. सैंदाणे यांनी केले आहे.**

## थोडक्यात

### अल्पवयीन मुलीला पळविले; गुन्हा दाखल

**नंदुरबार ।** शहरातून १७ वर्ष ५ महिने वयाच्या अल्पवयीन मुलीला पळवून नेल्याची घटना घडली. याबाबत पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. ३० डिसेंबर रोजी दुपारी ३.४५ च्या सुमारास पिंपळोद ता. नंदुरबार येथील राकेश रंजित वसावे याने १७ वर्ष ५ महिने वयाच्या अल्पवयीन मुलीला पळवून नेले. याबाबत उपनगर पोलीस ठाण्यात वसावे याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलमः १३७ (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक जगन वळवी करीत आहेत.

### कोरीट येथे डॉ. विक्रम साराभाई यांना अभिवादन

**नंदुरबार ।** तालुक्यातील कोरीट येथे भारतीय अवकाश संशोधन कार्यक्रमाचे शिल्पकार, इस्रोचे संस्थापक आणि जागतिक कीर्तीचे थोर वैज्ञानिक डॉ. विक्रम साराभाई यांच्या पुण्यतिथीनिमित्त के.डी. गावित विद्यालयात सखोल व प्रेरणादायी स्मरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य मुकेश पाटील होते. कार्यक्रमाची सुरुवात विज्ञान शिक्षक राकेश पाटील यांच्या हस्ते डॉ. विक्रम साराभाई यांच्या प्रतिमापूजनाने करण्यात आली. प्रतिमापूजनानंतर अभिवादन करण्यात आले.



### नंदुरबारात २० हजारांची घरफोडी

**नंदुरबार ।** शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील घरात अज्ञात चोरटयांनी घरफोडी करुन २० हजार ६०० रुपयांची रोकडसह चांदीचे देव लंपास केले. सुदाम सुकलाल सोनवणे यांच्या घरातून दि.३१ डिसेंबर रोजी अज्ञात इसमाने ५ हजार ६०० रुपये किंमतीचे पाच देव, ८० ग्रॅम वजनाची एक चांदीची माळ, असा एकुण २० हजार ६०० रुपयांची रोख रक्कम व चांदीचे देव लंपास केला. याबाबत शहर पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोना देविदास नाईक करीत आहेत.

# आनंदविहार वृद्धाश्रमात रुग्णवाहिका लोकार्पण

प्रतिनिधी । धुळे

**मातोश्री वृद्धाश्रम सोरगाव यांच्या सौजन्याने, नगाव येथील आनंदविहार वृद्धाश्रमाला नवनवीन सोयी-सुविधांनी युक्त अशी रुग्णवाहिका लोकार्पण करण्यात आली.**



ठाणे येथील जीवन मांगल्य संस्थेचे सचिव अशोक देवरे-पाटील यांच्या हस्ते या रुग्णवाहिकेचे हस्तांतरण आनंदविहार वृद्धाश्रमाच्या पदाधिकाऱ्यांकडे करण्यात आले. वृद्धाश्रमातील ज्येष्ठांना तातडीची वैद्यकीय मदत मिळावी आणि प्रवासाची सोय व्हावी, या उद्देशाने हे महत्त्वपूर्ण दान देण्यात आले आहे.केवळ रुग्णवाहिकाच नव्हे, तर वाढत्या थंडीचा विचार करून संस्थेच्या वतीने सर्व आजी-आजोबांना उबदार ब्लॅंकेट देण्यात आले. तसेच वृद्धाश्रमाच्या दैनंदिन वापरासाठी आवश्यक फर्निचरचेही वितरण यावेळी करण्यात आले. या मदतीमुळे वृद्धाश्रमातील ज्येष्ठांनी समाधान व्यक्त केले आहे.

या सोहळयाप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष शशिकांत भदाणे यांच्यासह प्रमुख पाहुणे जीवन संध्या मांगल्य संस्थेचे सचिव अशोक देवरे-पाटील ॲड. सतीश पाटील, रमाकांत अहिरराव, स्वप्नील भदाणे, वसंतराव बच्छाव, पंडित भावसार, रावसाहेब देवरे, ग्रामीण विकास व कल्याण फाऊंडेशन आष्टाणेचे सर्व पदाधिकारी, अस्थिव्यंग शाळेच्या मुख्याध्यापिका शितल पाटील आदी उपस्थित होते.



**धुळे –** सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त धुळे महानगरपालिका सभागृहात सावित्रीमाईंच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मुख्य लेखाधिकारी बाळासाहेब तट्टू, उपायुक्त मनोज वाघ, सहाय्यक आयुक्त राजेंद्र माईनकर, विद्युत उपअभियंता नरेंद्र बागुल, लेखापाल चंद्रकांत मोरे, सुक्राम राऊत, ऋतिक गोयर आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# डोंगरगावजवळ अवैध वाळू वाहतूक करणारे ट्रॅक्टर जप्त; महसूल विभागाची कारवाई

प्रतिनिधी । शिंदखेडा

**तालुक्यात दि.२ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता वाघाडी खु. ते डोंगरगाव रस्त्यावर अनधिकृतरित्या वाळू वाहतूक करणारे विनाक्रमांकाचे ट्रॅक्टर महसूल विभागाच्या पथकाने पकडले.**



या कारवाईत तहसीलदार नितीनकुमार देवरे यांच्यासह नरडाणा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश मोरे, तलाठी व्ही. एस. सोनवणे (डोंगरगाव), डी. व्ही. बाविस्कर (खलाने), एस. बी. खलाने (वायपूर), मनोज साळवे (वालखेडा), पी. व्ही. अहिरराव (गोराणे) आदी अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.

सदर प्रकरणात संबंधितावर नवीन गौण खनिज अधिनियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येणार असून, आवश्यकता भासल्यास फौजदारी कारवाई देखील करण्यात येणार आहे.

दरम्यान, तालुक्यातील अवैधरीत्या गौण खनिज वाहतूक करणाऱ्यांनी विनापरवाना वाहतूक करू नये, अन्यथा नवीन अधिनियमानुसार दंडात्मक व फौजदारी कारवाईसोबतच संबंधित वाहन कायमस्वरूपी ब्लॅकलिस्ट करण्यात येईल, असा इशारा तहसीलदार देवरे यांनी दिला आहे.

# क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

प्रतिनिधी । धुळे

सामाजिक न्याय विभागांतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध मुला-मुलींसाठी कार्यरत शासकीय निवासी शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विभागामार्फत विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येतात. सन २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, तसेच त्यांचा क्रीडा कौशल्य व सर्वांगीण विकास व्हावा, या उद्देशाने कला व क्रीडा अविष्कार कार्यक्रमांतर्गत नाशिक महसूली विभागातील १० शासकीय निवासी शाळांमधील विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी क्रीडा स्पर्धा, स्नेहसंमेलन व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम दि. ९ ते १० जानेवारी या कालावधीत जिल्हा क्रीडा संकुलात होणार आहे.

# आचारसंहितेबाबत तक्रारीसाठी संपर्क करण्याचे आवाहन

प्रतिनिधी । धुळे

**राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार धुळे महापालिका क्षेत्रात महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ चा कार्यक्रम जाहीर झाला असून, संपूर्ण महापालिका क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे.**

निवडणूक कालावधीत निवडणूक प्रक्रियेशी संबंधित अथवा आदर्श आचार संहितेबाबत कोणत्याही प्रकारच्या तक्रारी किंवा निवेदने असल्यास धुळे महापालिका क्षेत्रातील नागरिकांनी आचारसंहिता कक्ष, धुळे महापालिका नवीन इमारत, धुळे येथे सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत तक्रार दाखल करु शकतील. हा नियंत्रण कक्ष १४ जानेवारी रोजी संपुर्ण दिवस व रात्र कालावधीसाठी सुरु राहणार आहे. तसेच लेखी तक्रारी drodhule2011 gmail. com या ई-मेलवर किंवा ०२५६२-२९५०१८ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधून सादर करता येईल. नगारिकांनी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**➤ तक्रार अथवा निवेदन सादर करतांना संबंधित पुरावे जोडणे आवश्यक असून प्राप्त तक्रारींचे निरसन आचार संहिता कक्षामार्फत करण्यात येणार आहे. असे आवाहन उपजिल्हाधिकारी तथा आचार संहिता कक्ष प्रमुख संजय बागडे यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.**

# धुळे महापालिका निवडणूक : मतदान व मतमोजणी काळात मनाई आदेश लागू

प्रतिनिधी । धुळे

**धुळे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हादंडाधिकारी, धुळे यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये मनाई आदेश जारी केले आहेत. हे आदेश दि. १५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या मतदानाच्या दिवशी तसेच दि. १६ जानेवारी रोजी होणाऱ्या मतमोजणी प्रक्रियेच्या कालावधीत लागू राहणार आहेत.**

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या दि. १५ डिसेंबर २०२५ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकानुसार व मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी तथा आयुक्त, धुळे महानगरपालिका यांच्या दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजीच्या पत्रानुसार धुळे महापालिकेची मतदान प्रक्रिया दि. १५ जानेवारी २०२६ रोजी तर मतमोजणी दि. १६ जानेवारी २०२६ रोजी पार पडणार आहे.

निवडणूक प्रक्रियेसाठी स्ट्रॉंग रूम व मतमोजणीचे ठिकाण महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, मार्केट यार्ड, पारोळा रोड, धुळे येथे निश्चित करण्यात आले आहे.

या अनुषंगाने दि. १४ जानेवारी २०२६ ते दि. १६ जानेवारी २०२६ रोजी संपूर्ण मतमोजणी प्रक्रिया संपेपर्यंत संबंधित परिसरात बेकायदेशीर जमाव, सभा, मोर्चे काढण्यास बंदी घालण्यात आली आहे.

मतदान व मतमोजणी केंद्राच्या १०० मीटर परिसरात राजकीय पक्षांचे बूथ उभारणे, प्रचार साहित्य वापरणे तसेच मोबाईल फोन, वायरलेस उपकरणे बाळगणे अथवा वापरण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच मतदान केंद्राच्या २०० मीटर परिसरात निवडणूक कर्तव्यावरील वाहनांव्यतिरिक्त इतर सर्व वाहनांच्या प्रवेशास बंदी राहणार आहे.

आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही जिल्हा प्रशासनाने दिला आहे.

# श्रावणी येथे सोयाबीन प्रक्रिया उद्योगाची जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांच्याकडून पाहणी

प्रतिनिधी । नवापूर

राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बॅंक (नाबार्ड) पुरस्कृत व डॉ. हेडगेवार सेवा समिती, नंदुरबार संचलित पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत श्रावणी, ता. नवापूर येथे महिला बचतगटाच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या सोयाबीन प्रक्रिया उद्योगाचा उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी संपूर्ण प्रकल्पाची सविस्तर माहिती जाणून घेत प्रकल्पाची कार्यपद्धती समजून घेतली. तसेच युनिटची पाहणी केली.



या सोयाबीन प्रक्रिया उद्योगासाठी कृषि विज्ञान केंद्र नंदुरबारचे तांत्रिक सहकार्य लाभले. कार्यक्रमास व्यासपीठावर जिल्हा नियोजन अधिकारी शशांक काळे, नाबार्ड जिल्हा विकास प्रबंधकरविंद्र मोरे, डॉ. हेडगेवार सेवा समितीचे अध्यक्ष केदारनाथ कवडीवाले, जिल्हा अग्रणी बॅंकेचे अधिकारी नंदकुमार पैठणकर तसेच पाणलोट क्षेत्र विकास समिती, श्रावणीचे अध्यक्ष संदीप कोकणी आदी उपस्थित होते. स्थानिक कृषी उत्पादनावर प्रक्रिया केल्यास त्यापासून चांगला फायदा शेतकऱ्यांना मिळू शकतो. नंदुरबार जिल्ह्यात यासाठी अनेक संधी आहेत अशा संधीचा शेतकऱ्यांनी आणि महिला बचत गटांनी लाभ घेऊन आर्थिक उन्नती साधावी असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. सेठी यांनी यावेळी केले.

नाबार्डचे जिल्हा विकास प्रबंधक रवींद्र मोरे यांनी महिला बचत गटाच्या या सोयाबीन प्रक्रिया उद्योगाचे कौतुक करीत व्यवसायात सातत्य ठेवून विक्री व्यवस्थापनावर भर द्यावा असे सांगितले.कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. हेडगेवार सेवा समितीचे अध्यक्ष केदारनाथ कवडीवाले यांनी जिल्ह्याच्या विकासासाठी होत असलेल्या जिल्हा प्रशासनाच्या प्रयत्नांचे कौतुक केले. पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून समाजातील शेवटच्या घटकाचा विकास साधणाऱ्या एकात्म मानव दर्शनाच्या दृष्टीकोनातून कार्य करण्याची गरज व्यक्त केली.

# सार्वजनिक मालमत्तेचे विद्रुपीकरण प्रकरणात सहा संस्थांवर गुन्हा

प्रतिनिधी । धुळे



शहरात सार्वजनिक मालमत्तेचे विद्रुपीकरण करणाऱ्यांना महापालिकेने कारवाईचा दणका दिला आहे. जयहिंद जलतरंग तलाव ते जयहिंद सिनियर कॉलेज या रस्त्यालगत विनापरवानगी बॅनर्स, पोस्टर्स व स्टिकर्स लावून शहराचे विद्रुपीकरण केल्याप्रकरणी संबंधित सहा संस्था व काही व्यक्तींविरोधात देवपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरण प्रतिबंध अधिनियम १९९५ च्या कलम ३ अंतर्गत ही कारवाई करण्यात आली. पाहणीदरम्यान या रस्त्यावर विविध व्यावसायिक आस्थापनांकडून विनापरवानगी जाहिरात साहित्य लावण्यात आल्याचे निदर्शनास आले होते.

याबाबत सहा. आयुक्त राजेंद्र माईनकर यांनी देवपूर पोलिसात फिर्याद दिली. शहराचे विद्रुपीकरण रोखण्यासाठी विनापरवानगी कृत्य करणाऱ्या संस्था व व्यक्तींविरोधात महापालिकेमार्फत व्यापक मोहिम राबविण्यात येत आहे.

# मनपाच्या ६३ जागांसाठी ३२१ उमेदवार रिंगणात

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव महानगरपालिका निवडणुकीच्या रिंगणातून उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी नाट्यमय घडामोडी घडल्या. राजकीय नेत्यांच्या यशस्वी शिष्टाईमुळे दोन दिवसांत एकूण ३१७ उमेदवारांनी माघार घेतली आहे. आता ७५ पैकी ६३ जागांसाठी ३२१ उमेदवार प्रत्यक्ष निवडणूक रिंगणात आहेत. विशेष म्हणजे, महापालिकेच्या १२ जागांवर आधीच बिनविरोध निवडीचे चित्र स्पष्ट झाल्याने आता उर्वरित जागांवरच राजकीय प्रतिष्ठा पणाला लागणार आहे.**



निवडणूक प्रक्रियेच्या प्रारंभी १०३८ इतकी मोठी उमेदवारांची संख्या होती. मात्र, माघारीच्या सत्रात ३०१ अपक्ष उमेदवारांसह प्रमुख पक्षांच्या उमेदवारांनी मैदान सोडल्याने आता लढतींचे चित्र पूर्णपणे स्पष्ट झाले आहे.

**प्रभाग क्र. १ अ:** सपकाळे रिटा विनोद (भाजपा), मोरे प्रियंका रविंद्र (शिवसेना-उबाठा), सुरवाडे पल्लवी विजय (वंचित बहुजन आघाडी), निकम मेघना कुंदन (अपक्ष), मोरे स्वप्नजा प्रशांत (अपक्ष), माया बुधा अहिरे (अपक्ष), दक्षा दीपक सोलंकी (अपक्ष), जोहरे प्रिया मधुकर (अपक्ष). १ ब: पोकळे दिलीप बबनराव (शिवसेना), पाटील रावसाहेब चिंधा (अपक्ष), फेगडे घनश्याम भगवत (अपक्ष), महाले चेतन सुरेश (अपक्ष), अबोली अशोक गावंडे (अपक्ष), जाधव निलेश संजय (शिवसेना-उबाठा). १ क: चव्हाण ललीता रमेश (काँग्रेस), दांडेकर संगीता प्रल्हाद (शिवसेना), पाटील संगिता गोकुळ (अपक्ष), खान फरहाना जुनेद (अपक्ष), छायाबाई नामदेव वाघ (स्वराज्य शक्तीसेना), आरती गोविंद तिवारी (अपक्ष), गरुड सरला लक्ष्मण (शिवसेना-उबाठा), फेगडे सुनंदा भागवत (अपक्ष). १ ड: गोकुळ रमेश चव्हाण (काँग्रेस), खान (पठाण) फरदीन फिरोज खान (शिवसेना), सोनवणे भारती सागर (अपक्ष), खान जुनेद नसिर (शिवसेना-उबाठा), सचिन श्रावण सुरवाडे (अपक्ष).

**प्रभाग क्र. २अ:** सोनवणे सागर श्यामकांत (शिवसेना) (बिनविरोध), २ ब: जाधव शुभांगी सजंय (अपक्ष), हर्षदा अमोल सांगोरे (अपक्ष), रेखा भगवान सोनवणे (राष्ट्रवादी-शरद पवार), सैदाणे कविता चेतन (अपक्ष), बाविस्कर उज्वला किशोर (शिवसेना), नसरीन बी मोहम्मद आसिफ (काँग्रेस)., २ क: खान सानियाबी इस्माईल (काँग्रेस), बाविस्कर धनश्री गणेश (अपक्ष), दारकुंडे पायल नवनाथ (राष्ट्रवादी-शरद पवार), जगताप पुजा विजय (भाजपा), इंगळे शितल रमेश (अपक्ष), बोरा शारदा जयराज (स्वराज्य शक्ती सेना), २ ड: पाटील कमल हिरामण (अपक्ष), मोहम्मद हुजेब मोहम्मद फारुख शेख (काँग्रेस), बाविस्कर गणेश दत्तात्रय (अपक्ष), विजय गजानन बांदल (भाजपा), शिंदे उत्तम रामभाऊ (राष्ट्रवादी-शरद पवार), अरविंद कुडंलिक सोनवणे (अपक्ष), भगवान काशिनाथ सोनवणे (अपक्ष), अब्दुल रहिम अब्दुलहक शेख (अपक्ष), हिवकर योगेश दत्तात्रय (आप), निलेश जयराज बोरो (स्वराज्य शक्ती सेना).

**प्रभाग क्र. ३ अ:** पवार ऐश्वर्या सुरेश (अपक्ष), सपकाळे मिना धुडकु (अपक्ष), वृषाली अर्जुन भारुळे (अपक्ष), पाटील अर्चना सजंय (भाजपा), भालेराव वैशाली धिरज (शिवसेना-उबाठा), ३ ब: ठाकरे चैताली राहूल (अपक्ष), सोनवणे प्रतिक्षा कैलास (भाजपा), सपकाळे रजंना भरत (अपक्ष), सोनवणे वर्षा गणेश (अपक्ष), ममता दिलीप सोनवणे (काँग्रेस), काचंन विकास सोनवणे (अपक्ष), ३ क: कोल्हे प्रविण रामदास (शिवसेना), शिंपी प्रमोद शातांराम (अपक्ष), सुषमा दिपक चौधरी (अपक्ष), सोनवणे आकाश सुरेश (अपक्ष), सपकाळे कविता मिलींद (काँग्रेस), ३ ड: तायडे भिमराव गौतम (अपक्ष), सपकाळे भरत शकंर (अपक्ष), सोनवणे मिराबाई रामेश्वर (काँग्रेस), बाविस्कर सोनाली मनोहर (अपक्ष), नारखेडे ललीत विजय (अपक्ष), तायडे निलेश विश्वनाथ (भाजपा), प्रदिप शकंर आव्हाड (अपक्ष), पवार अनिल मोहन (शिवसेना-उबाठा), भोई योगेश चुडामन (आप).

**प्रभाग क्र. ४ अ:** ढंढोरे शशिबाई शिवचरण (भाजपा), बागरे हिरकणी जितेंद्र (अपक्ष), सनकत कंचन चेतन (अपक्ष), जावळे सोनम निलेश (शिवसेना-उबाठा), ४ ब: चौधरी बेबाबाई सुरेश (शिवसेना-उबाठा), सोनवणे विदया मुकंद (भाजपा), चौधरी चेतना किशोर (अपक्ष), पाटील कोकीळा तुकाराम (अपक्ष) ४ क: सोनवणे कल्पेश कैलास (भाजपा), बारी मयुर श्रावण (शिवसेना-उबाठा), सकंत चेतन गणेश (अपक्ष), ४ ड: जोशी प्रकाश गणेश (मनसे), शेख मो. तौसीफ शरीफ (शिवसेना-उबाठा), सैय्यद वाजीद सैय्यद आबीद (सपा), पाटील तृप्ती पाडुंरग (स्वराज्य शक्ती सेना), कोल्हे पियुष ललीत (शिवसेना), निकुम सजंय प्रभाकर (आप).

**प्रभाग क्र. ५ अ:** भंगाळे विष्णु रामदास (शिवसेना), पाटील पियुष नरेंन्द्र (अपक्ष), प्रविण विष्णु माळी (शिवसेना-उबाठा),५ ब: मगंला संजय चौधरी (शिवसेना), तायडे ज्योती शरद (शिवसेना-उबाठा), ५ क: पाटील आशा रमेश (भाजपा), देशमुख पुजा रमेश (शिवसेना-उबाठा), मसरत जब्बीन मोहम्मद हनीफ (अपक्ष), ५ ड: लड्ढा नितिन बालमुकुंदा (भाजपा), गांधी पियुष संजयकुमार (शिवसेना-उबाठा), माळी सुनिल दत्तात्रय (अपक्ष), बागवान मोहम्मद हाशिम (अपक्ष), भोळे अश्विन सुरेश (अपक्ष), अनिल रमेशचंद्र पगारीया (अपक्ष), सादिक हानीफ (अपक्ष), ॲड विजय बाबुलाल दानेज (अपक्ष).

**प्रभाग क्र. ६ अ:** वाढे कोमल प्रमोद (अपक्ष), धांडे जयश्री अशोक (अपक्ष), पाटील हेतल महेंद्र (राष्ट्रवादी-शरद पवार), आर्शीनबानो शोएब खाटीक (शिवसेना-उबाठा), ६ ब: मिश्रा प्रेरणा रामेश्वर मिश्रा (राष्ट्रवादी-शरद पवार), हाडा शुचिता अतुलसिंग (भाजपा), सावेरा रहिम तडवी (अपक्ष), पाटील मंगला भरत (अपक्ष), जहाआरबी बशीर खान (अपक्ष), टेकावडे रजनी मनोज (अपक्ष), पायल रिंकु चौधरी (शिवसेना-उबाठा), शेख जैबुनिस्सा मोहम्मद (सपा),६ क: तनवीर अब्दुल रशीद शेख (राष्ट्रवादी-शरद पवार), काळे अमित पाडुरंग (भाजपा), धिरज मुरलीधर सोनवणे (शिवसेना-उबाठा), शेख फिरोज शेख हुसेन (राष्ट्रवादी-अजित पवार), ६ ड: राजपुत किरण लक्ष्मण (राष्ट्रवादी-शरद पवार), सुर्यवंशी रुट्रेंद्र प्रभाकर (भाजपा), साहित्या जयप्रकाश सतिषलाला (अपक्ष), विकास प्रल्हाद पाटील (अपक्ष), तायडे नितीन सोमा (स्वराज्य शक्तीसेना), देशमुख किशोर मधुकर (शिवसेना-उबाठा), फारुख सैय्यद गफ्फार (अपक्ष)

**➤ प्रभाग क्र. ७ अ: काळे दिपमाला मनोज (भाजपा) (बिनविरोध), ७ ब: पाटील अंकिता पंकज (भाजपा) (बिनविरोध), ७ क: विशाल सुरेश (राजुमामा) भोळे (भाजपा) (बिनविरोध), ७ ड: उत्तरदे चंद्रशेखर प्रकाश (भाजपा), हिवराळे भिकन मुरलीधर (शिवसेना-उबाठा), सचिन भिमराव पाटील (अपक्ष).**

**प्रभाग क्र. ८ अ:** उज्वला कुलभुषण पाटील (शिवसेना-उबाठा), कविता सागर पाटील (भाजपा), ८ ब: भोईटे मानसी निलेश (भाजपा), सोनवणे शोभा रविंद्र (शिवसेना-उबाठा), ८ क: पाटील विजय पुडंलिक (अपक्ष), जैन भागचंद मोतीलाल (भाजपा), कापसे मयुर चद्रकांत (शिवसेना-उबाठा), ८ ड: नरेंद्र आत्माराम पाटील (शिवसेना), अनपट विनोद सुनिल (अपक्ष), मंदा छोटुलाल सोनवणे (अपक्ष), पुनमचंद सुपडु पाटील (शिवसेना-उबाठा).

**प्रभाग क्र. ९ अ:** चौधरी मनोज सुरेश (शिवसेना) (बिनविरोध), ९ ब: देशमुख प्रतिभा गजानन (शिवसेना) (बिनविरोध), ९ क: गायकवाड सुवर्णा गणेश (शिवसेना-उबाठा), अग्रवाल विजय प्रमोद (अपक्ष), जयश्री राहूल पाटील (भाजपा), महाले सुनंदा नारायण (अपक्ष), पाटील सुनंदा सुधाकर (अपक्ष), ९ ड: सुर्यवंशी कुंदन यादवराव (अपक्ष), ठाकरे निलेश राजेंद्र (शिवसेना-उबाठा), पाटील चंद्रशेखर शिवाजी (भाजपा).

**प्रभाग क्र. १० अ:** कलाबाई नारायण शिरसाठ (अपक्ष), निकम कौशल्याबाई उत्तम (शिवसेना-उबाठा), श्रीकांत मिलींद गायकवाड (काँग्रेस), सोनवणे सुरेश माणिक (भाजपा), सोनवणे पद्माकर देवचंद (स्वराज्य शक्तीसेना), गौरव दामोदर सुरवाडे (अपक्ष), १० ब: बारी माधुरी आतुल (भाजपा), पुष्पा विठ्ठल चौधरी (शिवसेना-उबाठा), १० क: शेख हसिना बी शरीफ (शिवसेना-उबाठा), इंगळे निलु संजय (अपक्ष), शिवदे कविता किरण (भाजपा), फिरोजाबी शेख शरीफ (स्वराज्य शक्तीसेना), १० ड: कुलभुषण विरभान पाटील (शिवसेना-उबाठा), जाकीर खान रसुल खान (भाजपा), शेख अहमद नुर लतीफ (अपक्ष), छाया फकीरा आडकमोल (काँग्रेस), नंदकिशोर बारकु भोई (अपक्ष), शेख मेहमुदाबी हुसेन (सपा), अजय राजु भोगे (अपक्ष), रगरेज अमजद सत्तार (अपक्ष), सोनवणे चेतन नाना (स्वराज्य शक्तीसेना).

**➤ प्रभाग क्र. ११ अ: भिल पार्वताबाई दामु (शिवसेना-उबाठा), डॉ. सोनवणे अमृता चंद्रकांत (शिवसेना), ठाकुर सुशिला सुभाष (अपक्ष), कोळी अरुणाबाई सुहास (अपक्ष), तडवी हिना रशीद (राष्ट्रवादी-शरद पवार) ११ ब: संतोष मोतीराम पाटील (शिवसेना), भोळे गिरीष कैलास (अपक्ष), कैलास बुधा पाटील (अपक्ष), अशिष सुभाष जाधव (हिंदू महासभा), ११ क: संगिता शालीग्राम मिस्तरी (अपक्ष), साळुंखे जया रघुनाथ (स्वराज शक्तीसेना), कोल्हे सिंधु विजय (शिवसेना), सांगोळे निता संजय (शिवसेना-उबाठा), ११ ड: अनिल पितांबर वाघ (राष्ट्रवादी-शरद पवार), पाटील सुनिल ज्ञानेश्वर (अपक्ष), मिस्तरी राजेंद्र सुकलाल (मनसे), किशोर पंडरिनाथ माळी (काँग्रेस), बाविस्कर संतोष विजय (स्वराज शक्तीसेना), कोल्हे ललित विजय (शिवसेना), मिस्तरी संजय भानुदास (अपक्ष).**

**प्रभाग क्र. १२ अ:** अनिल सुरेश अडकमोल (भाजपा), भोसले किशोर छगन (अपक्ष), नितीश कैलास कापडणे (अपक्ष), सपकाळे कृष्णा रुपचंद (अपक्ष), ललितकुमार रामकिशोर घेगले (राष्ट्रवादी-शरद पवार), १२ ब: उज्वला मोहन बेंडाळे (भाजपा) (बिनविरोध), १२ क: राणे गायत्री इंदजित (भाजपा), रिना ऋषी भारसके (वंचित बहुजन आघाडी), १२ ड: बरडे नितीन मनोहर (भाजपा), खुशाल पंडीत सोनवणे (बहुजन मुक्ती पार्टी), स्वप्नील अशोक परदेशी (अपक्ष), जितेंद्र भागवत केदार (वंचित बहुजन आघाडी), पवार सुरेश पोपट (राष्ट्रवादी-शरद पवार), निकुंभ संजय प्रभाकर (आप).

**प्रभाग क्र. १३ अ:** पाटील सत्यजित विश्वास (अपक्ष), सपके नितिन प्रभाकर (भाजपा), हेमंत सुभाष भंगाळे (राष्ट्रवादी-शरद पवार), आशिष सुभाष जाधव (अपक्ष), १३ ब: हर्षा उदय पवार (अपक्ष), प्रियंका विनोद तायडे (अपक्ष), तायडे सुरेखा नितिन (भाजपा), अश्विनी विलास वाघ (अपक्ष), चौधरी देवयानी सुभाष (राष्ट्रवादी-शरद पवार), १३ क: पाटील वैशाली अमित (भाजपा) (बिनविरोध), १३ ड: जितेंद्र भगवान मराठे (अपक्ष), शिरसाठ गणेश गगांराम (अपक्ष), पाटील मगन व्यकंट (अपक्ष), देवकर प्रफुल्ल गुलाबराव (राष्ट्रवादी काँग्रेस), पाटील सुहास साहेबराव (राष्ट्रवादी-शरद पवार), अनिल रमेशचंद पगारीया (अपक्ष), निकुंभ संजय प्रभाकर (आम आदमी).

**प्रभाग क्र. १४ अ:** महाजन सुनिल सुपडु (भाजपा), लाडवंजारी अशोक सिताराम (राष्ट्रवादी-शरद पवार), ॲड. सचिन शिवाजी हटकर (अपक्ष), सरफराज फरीद शेख (एमआयएम), १४ ब: पटेल शिरीन वसीम अहमद (काँग्रेस), महाजन जयश्री सुनील (भाजपा), तडवी नाजमिन मकबुल (राष्ट्रवादी-शरद पवार), रेहनाबी शेख आसीफ (एमआयएम), पारधे प्रियंका सुभाष (अपक्ष), १४ क: रबियाबी अमजद खान (भाजपा), पठाण शकीलाबी अय्युब खान (एमआयएम), काकर सना अक्रम (राष्ट्रवादी-शरद पवार), जैन खुशबु मोहित (अपक्ष), खान रिजवानबी वसीम (अपक्ष), शेख सबिनाबी बबलु (सपा), १४ ड: ढेकळे रितीक संजय (भाजपा), बागवान जाकीर बिसमिल्ला (काँग्रेस), शेख जमीलोद्दीन शेख शरीफोद्दीन (राष्ट्रवादी-शरद पवार), पटेल इम्रान शब्बीर (एमआयएम), खान अजमल खान अफजल खान (अपक्ष), शेख नजीम शेख सलीम (अपक्ष), शेख बबलु जोहरोद्दीन (सपा).

**प्रभाग क्र. १५ अ:** देशमुख अरविंद भगवान (भाजपा), बागडे गणेश नंदु (अपक्ष), १५ ब: प्रिया विनय केसवानी (अपक्ष), साक्षी गुरुबक्ष जाधवाणी (अपक्ष), शिरसाळे कलाबाई नारायण (भाजपा), १५ क: रेश्मा कुदंन काळे (शिवसेना), चौधरी रुपाली स्वप्नील (अपक्ष), भालेराव रेखा सिध्दार्थ (राष्ट्रवादी-शरद पवार), १५ ड: जितेंद्र प्रकाशलाल कुकरेजा (अपक्ष), खुशाल तिलकराज शर्मा (अपक्ष), खुपचंद प्रेमचंद साहित्या (अपक्ष), बालाणी प्रकाश रावलमल (भाजपा), तायडे संजय सोना (काँग्रेस), चांगरे चेतन दिलीप (अपक्ष).

**प्रभाग क्र. १६ अ:** विश्वनाथ सुरेश खडके (भाजपा) (बिनविरोध), १६ ब: इंगळे वदंना संतोष (भाजपा), कोल्हे हर्षाली मनिष (अपक्ष), १६ क: रंजना विजय वानखेडे (भाजपा), अंजु योगेश निबाळकर (अपक्ष), अत्तरदे ईच्छा दिपक (अपक्ष), चौथे मयुरी जितेंद्र (अपक्ष), मिनल हर्षल मावळे (अपक्ष). १६ ड: खडके सुनिल वामनराव (भाजपा), शर्मा ललित गौरीशंकर (मनसे), चौधरी अमोल रविंद्र (स्वराज्य शक्ती सेना).

**प्रभाग क्र. १७ अ:** वजांरी जयश्री गजानन (अपक्ष), शाह जरिना शब्बीर (शिवसेना-उबाठा), मसरत जब्बीन मोहम्मद हनीफ (अपक्ष), कोल्हे चेतना नरेंद्र (स्वराज्य शक्तीसेना), हिना युनुस पिंजारी (राष्ट्रवादी काँग्रेस). १७ ब: हिनाबी शाकीर खान (शिवसेना-उबाठा), पुनम भरत सोनवणे (अपक्ष), सालेहा तसलिम पटेल (अपक्ष), मुमताज बी शेख उस्मान (सपा), सुमैय्या वसीम पटेल (राष्ट्रवादी काँग्रेस), सईदाबी शेख युसुफ (काँग्रेस), पटेल जैनाब (एमआयएम). १७ क: शेख शहीद शेख सादीक (अपक्ष), उज्वल सुरेश पाटील (अपक्ष), पटेल इब्राहिम मुसा (शिवसेना-उबाठा), पिरजादे इकबालोद्दीन जियोद्दिन (राष्ट्रवादी काँग्रेस), खान निजाम मासुम खान (अपक्ष), खाटीक खालीद खाटीक इस्माईल (एमआयएम), शेख शिबान फाईज अहमद हुसेन (सपा), ईनामदार सौफुउल्लाह हबीबउल्लाह (काँग्रेस), शेख सोहेल आरिफ (अपक्ष). १७ ड: वजांरी अक्षय योगेश (शिवसेना-उबाठा), मुजीब हारुन पटेल (काँग्रेस), अनिस अहमद अय्युब शाह (अपक्ष), मो. अकरम राजु देशमुख (अपक्ष), शाह आरीफ इस्माईल (अपक्ष), नाईक प्रशांत सुरेश (राष्ट्रवादी काँग्रेस), रियाज अब्दुल करीम बागवान (एमआयएम), अल्फैज अमीर पाशा पटेल (सपा).

**प्रभाग क्र. १८ अ:** डॉ. सोनवणे गौरव चंद्रकात (शिवसेना) (बिनविरोध) १८ ब: सोनवणे नलुबाई तुळसीदास (शिवसेना), पाटील ज्योती विठ्ठल (अपक्ष), तापीबाई रणजित राठोड (शिवसेना-उबाठा), राठोड वैशाली सुदाम (मनसे), यास्मिन मोहसीन खाटीक (अपक्ष), घुगे उज्वला संजय (अपक्ष). १८ क: अनिता सुरेश भापसे (शिवसेना), आठरे कुसुम अशोक (मनसे), सोनवणे सोनम रोहीदास (शिवसेना-उबाठा), चव्हाण प्रमीला दिलीप (काँग्रेस), भापसे सुनिता चंद्रकांत (अपक्ष), अर्चना ललित कोळी (अपक्ष), शबनम जुबेर पटेल (एमआयएम). **प्रभाग क्र. १९ अ:** पाटील रेखा चुडामण (शिवसेना) (बिनविरोध) १९ ब: विक्रम किसन सोनवणे (शिवसेना) (बिनविरोध) १९ क: देशमुख निकीता अनिल (शिवसेना), सपकाळ अलका राजेंद्र (राष्ट्रवादी-शरद पवार), मोरे कोकीळा प्रमोद (अपक्ष). १९ ड: श्रीकृष्ण गोविंदा वाघ (अपक्ष), विशाल गगांराम पवार (काँग्रेस), पाटील राजेंद्र झिपरु (भाजपा), पाटील गणेश भागवत (अपक्ष), ढाकणे दिनेश मधुकर (अपक्ष), सुर्यवंशी संग्रामसिंह सुरेश (राष्ट्रवादी-शरद पवार), सोनवणे महेश सुदाम (अपक्ष), गव्हाणे किरण शिवाजी (अपक्ष) असे उमेदवार रिंगणात आहेत.

## बामणोद ग्रा.पं. तर्फे कन्याश्री सन्मान योजना सुरू

**यावल ।** तालुक्यातील बामणोद ग्रा.पं. तर्फे सरपंच राहुल तायडे यांच्या संकल्पनेतून कन्याश्री सन्मान योजना सुरु करण्यात आली. या योजनेत १ जानेवारीपासून गावातील कुटुंबात जन्माला येणाऱ्या मुलीचा सन्मान म्हणून मुलीच्या जन्मानंतर अधिकृत नोंदणी झाल्यावर आईच्या नावे २ हजार १११ रूपयांचा धनादेश स्वरूपात देण्यात येईल. सरपंच गिरीष (राहुल) तायडे यांनी ही माहिती दिली. महिला सक्षमीकरणासाठी ग्रा.पं.च्या वतीने उचललेले मोठे पाऊल ठरणार आहे.

## नवनिर्वाचित नगराध्यक्षांचा कामचुकारांवर कारवाई करण्याचा इशारा

प्रतिनिधी । पारोळा

येथील नगरपरिषदेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांचे नवे पर्व सुरू झाले आणि पहिल्याच बैठकीत सर्वानुमते लोकहिताचे निर्णय घेण्यात आले. या बैठकीत नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांना काही सूचना देण्यात आल्या. तसेच कामचुकारांवर कारवाई करण्याचा इशारा देखील यावेळी देण्यात आला.



बैठकीत १ जानेवारीपासून शहर हद्दीत ज्या बालकांचा जन्म होईल त्याची नोंद करतेवेळी नगरपरिषदेच्यावतीने नवजात शिशूच्या वापरासाठी विविध वस्तू असलेले बेबी किट मोफत देण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच शहरातील ज्या व्यक्तीचा मृत्यू होईल, त्यासाठी लागणाऱ्या गवरी, तूप, कापूर हे सर्व साहित्य पालिकेतर्फे मोफत देण्यात येईल, असा हा लोकहितार्थ निर्णय या बैठकीत घेण्यात आला. या निर्णयाचे शहरात स्वागत होत असून यापुढेही नगराध्यक्ष व नगरसेवक हे लोकहिताचे निर्णय घेतील, असा विश्वास नागरिकांकडून व्यक्त होत आहे. या बैठकीत नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांनाही काही सूचना देण्यात आल्या. शहरातील आरोग्य, साफसफाई व प्रत्येक वार्डात घंटागाडी ही वेळेवर पोहोचवावी, याची काळजी घेण्याची सूचना देण्यात आली. तसेच शहरातील दिवाबत्ती व अतिक्रमणबाबत कोणताही समझोता केला जाणार नाही. म्हणून सर्व कर्मचाऱ्यांनी दक्षता घेऊन या कामांकडे लक्ष द्यावे, अश्या सूचना देण्यात आल्या. याप्रसंगी शहरातील सर्व नवनिर्वाचित नगरसेवक, नगरसेविका व नगरपरिषदेच्या सर्व विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

## जि.प.उर्दू शाळेत आनंद मेळावा

प्रतिनिधी । मुक्ताईनगर

**येथील जिल्हापरिषद उर्दू मुलांची शाळा क्र.२, मुक्ताईनगर येथे बाल आनंद मेळावा उत्साहपूर्ण आणि आनंदी वातावरणात पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन आ. चंद्रकांत पाटील यांच्यासह सर्व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.**

या मेळाव्यात शाळेच्या विद्यार्थ्यांनी एकूण ४० स्टॉल्स उभारले होते. विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या वस्तू, खाद्यपदार्थ व शैक्षणिक साहित्याचे आकर्षक प्रदर्शन व विक्री केली. प्रत्येक स्टॉलवर विद्यार्थ्यांनी उत्साहाने आपली कला व कौशल्य सादर केले. यावेळी उपस्थित पालक व पाहुण्यांनी मनापासून कौतुक केले. या मेळाव्यातून सर्व ४० स्टॉल्सद्वारे एकूण २० हजार रुपये इतकी विक्री झाली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना व्यवहारज्ञान, आर्थिक देवाण-घेवाण, संघभावना तसेच आत्मनिर्भरतेचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने बाल आनंद मेळावा हा उपक्रम यशस्वी, प्रेरणादायी व संस्मरणीय ठरला.

## मालखेडे येथे कृषी विभाग अंतर्गत मका पिकाची शेती शाळा

### ➲ पिके उत्पादन वाढ मोहीम राबविण्याच्या सहायक कृषी अधिकाऱ्यांनी दिल्या सूचना

प्रतिनिधी । एरंडोल

**कासोदा येथुन जवळच असलेल्या मालखेडा, उमरे येथे कृषी विभाग एरंडोल अंतर्गत शेती शाळा घेण्यात आली या कालावधीमध्ये पिके उत्पादन वाढ मोहीम राबविण्याच्या सूचना प्राप्त झाल्या आहेत. त्याअनुषंगाने मालखेडा येथे क्रॉपसॅप अंतर्गत मका पिकाची शेती शाळा उत्साहात पार पडली.**



सहाय्यक कृषी अधिकारी सैंदाणे यांनी प्रास्ताविक करून शेतीशाळेचे महत्त्व विशद केले. या शेतीशाळेसाठी मालखेडा, उमरे ग्रुप ग्रामपंचायतीचे युवा सरपंच सचिन पाटील, सहायक कृषी अधिकारी सैदाणे, दीप काकडे, उपकृषी अधिकारी परमेश्वर बेंडगे, कृषी सहायक आशिष महाले आदी उपस्थित होते. त्यांनी मका पिकावरील समस्या, किड व रोग, खत व्यवस्थापन, एकात्मिक किड नियंत्रण इत्यादी विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले.

मका पिकावरील लष्करी अळीचे नियंत्रण करण्यासाठी मशागतीय उपायोजना, यांत्रिक नियंत्रण पद्धती, जैविक नियंत्रण पद्धती, रासायनिक नियंत्रण पद्धती यांची सविस्तर माहिती दिली.

लष्करी अळीचे नियंत्रण करण्यासाठी शेत तणमुक्त ठेवावे, एकरी दहा पक्ष थांबे लावण्यात यावेत, एकरी पाच कामगंध सापळे वापरण्यात यावे, तसेच संध्याकाळी सहा ते नऊ या कालावधीमध्ये प्रकाश सापळे लावण्यात यावे, महानिंब सुपर या जैविक किडनाशकाची ४० ग्रॅम प्रति दहा लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करून जैविक किडनियंत्रण करण्याचे आवाहन सैंदाणे साहेब यांनी केले.

## मंगरूळ शाळेची एमआयडीसीमध्ये औद्योगिक क्षेत्र सहल

प्रतिनिधी । अमळनेर

**तालुक्यातील मंगरूळ येथील स्व. आबासो अनिल अंबर पाटील माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची औद्योगिक क्षेत्र भेट सहल एमआयडीसीमध्ये काढण्यात आली.**

### विद्यार्थ्यांनी लघु उद्योग, व्यवसायाची घेतली माहिती

विद्यार्थ्यांना लघु उद्योग, व्यवसाय प्रशिक्षण मिळावे तसेच विविध उत्पादनाची माहिती प्राप्त व्हावी म्हणून विद्यार्थ्यांची एमआयडीसीमध्ये सहल काढण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी गंगा फूडस धान्य पॉलीश, आटा फॅक्टरी येथे गव्हापासून सुजी, रवा, पीठ, मैदा कसे तयार होतात. तसेच पाईप फॅक्टरी, पाण्याच्या टाकीची कंपनीत पाईप आणि टाक्या कशा तयार होतात. शुद्ध पाणी तयार होऊन ते बाटल्यांमध्ये कसे भरतात. पुठ्ठाचे खोके कसे तयार करतात, चप्पलचे सोल कसे तयार करतात, अशा विविध उद्योगांची माहिती जाणून घेतली. यासाठी दिलीप डेरे, निलेश भांडारकर, जितेंद्र चंद्रात्रे, राधेश्याम यांनी मार्गदर्शन केले. तर सहलीसाठी मुख्याध्यापक प्रकाश पाटील, प्रभुदास पाटील, संजय पाटील, राजेंद्र पाटील, सुषमा सोनवणे, शीतल चव्हाण, सीमा मोरे, सीमा पाटील, प्रवीण पाटील, मनोज पाटील, सुदर्शन पवार, खुशाल पाटील, प्रदीप पाटील यांचे सहकार्य लाभले. उद्योजकांकडून विद्यार्थ्यांना मोफत अल्पोपहार देण्यात आला.

या औद्योगिक क्षेत्र भेटीमुळे इयत्ता ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांना व्यवसाय, लघु उद्योगाची प्रेरणा मिळाली. मालाची ने-आण, विक्री, वाहतूक कशी करतात, बाजारपेठ कशी उपलब्ध होते, अशी माहिती त्यांनी दिली.